नवी आशा नवी दिशा
सार्वमत

जरांगेंच्या गावात दगडफेक

बीड– मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांचे बीड जिल्ह्यातील मातोरी गावात काल रात्री दगडफेक करण्यात आली. या कारणाने काहीकाळ तणावाचे वातावरण होते. घटनेची माहिती कळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून परिस्थिती नियंत्रणात असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान डीजे वाजविण्याच्या कारणावरुन शाब्दीक बाचाबाची झाली आणि त्याचे रुपांतर दगडफेकीमध्ये झाले. यात काही दुचाकी वाहनांचेही नुकसान झाले आहे. या दगडफेकीत डीजेचेही नुकसान झाले आहे. सध्या या गावात तणावपूर्ण शांतता आहे.

सेना जिल्हाप्रमुखांच्या कार्यालयाची तोडफोड

बीड– येथील शिवसेना जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांच्या जालना रोडवरील कार्यालयाची तोडफोड करण्यात आली आहे. पंकजा मुंडे यांच्या समर्थकांनी ही तोडफोड केल्याची माहिती आहे. काल गुरुवारी खांडे यांची कथित ऑडिओ क्लिप व्हायरल झाली होती. यामध्ये त्यांनी पंकजा मुंडे यांना पहिल्यांदाच धोका दिला असं म्हटलं होतं. त्याचे पडसाद आता उमटत आहेत. या तोडफोडीची माहिती मिळताच बीड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ घटनास्थळी दाखल झाले होते.

महत्त्वाचे

कोल्हार खुर्द येथून ३ जुलै रोजी पायी दिंडीचे प्रस्थान

कोल्हार (वार्ताहर)– लहानु बाबा महाराज झावरे व माधव बाळाजी पाटील यांच्या आशीर्वादाने प्रतिवर्षीप्रमाणे राहुरी तालुक्यातील कोल्हार खुर्द येथील ग्रामदैवत बिरोबा महाराज मंदिरापासून बुधवार ३ जुलै रोजी सकाळी १० वाजता संत शिरोमणी सावता महाराज पायी दिंडी सोहळ्याचे प्रस्थान होणार आहे. दिंडीचे हे ४८ वे वर्ष आहे. अहमदनगर जिल्ह्यातील ही एकमेव दिंडी श्रीक्षेत्र अरण येथील श्री संत सावता महाराजांच्या संजीवन समाधीचे दर्शन घेऊन त्यामार्गे पंढरपूरकडे प्रस्थान करते. दिंडी सोहळा राहुरी फॅक्टरी, नांदगाव शिंगवे, अहमदनगर, दहेगाव साकत, घोगरगाव, पाटेगाव, जातेगाव, करमाळा, पांगरे, टेंभुर्णी, अरण, रोपळे या मार्गाने पंढरपूर येथे मुक्कामी पोहोचणार आहे. दिंडीमध्ये शंकर महाराज लोखंडे, श्री. चितळकर, निलेश महाराज शिरसाठ, सुधाकर महाराज घोगरे, रेवणनाथ महाराज शिरसाठ, मुकुंद महाराज भगत, दिलीप महाराज चव्हाण यांची प्रवचने होतील. दिंडी सोहळ्यामध्ये जास्तीत जास्त वारकऱ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन कोल्हार खुर्द पायी दिंडी सोहळा समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

राहाता बाजार समितीत सोयाबीनला ४४०० रुपये भाव

राहाता (तालुका प्रतिनिधी)– काल राहाता बाजार समितीत सोयाबीनला ४४०० रुपये भाव मिळाला. गुरुवारी राहाता बाजार समितीत सोयाबीनची १३ क्विंटलची आवक झाली. सोयाबीनला किमान ४३३० रुपये, जास्तीत जास्त ४४०० रुपये तर सरासरी ४३७५ रुपये भाव मिळाला. गव्हाला सरासरी २५९० रुपये भाव मिळाला. ज्वारीला सरासरी १४९० रुपये. हरभरा किमान ५५५१ रुपये, जास्तीत जास्त ६४५१ रुपये, तर सरासरी ६२०० रुपये भाव मिळाला, मकाला सरासरी २००० रुपये, तर तुरीला ७८५० रुपये सरासरी भाव मिळाला. डाळिंबाच्या ६५६६ क्रेटसची आवक झाली. डाळिंब नंबर १ ला किमान १४६ रुपये तर जास्तीत जास्त २०५ रुपये प्रतिकिलोला भाव मिळाला. डाळिंब नंबर २ ला किमान ८६ रुपये तर जास्तीत जास्त १४५ रुपये. डाळिंब नंबर ३ ला किमान ३६ ते जास्तीत जास्त ८५ रुपये. डाळिंब नंबर ४ ला किमान १० रुपये तर जास्तीत जास्त ३५ रुपये असा भाव मिळाला.

स्क्वॅश ॲण्ड रॅकेट स्पर्धेत ज्ञानगंगाचे सुयश

आश्वी (वार्ताहर)– अहमदनगर स्क्वॅश अँड रॅकेट असोसिएशनतर्फे जिल्हास्तरीय स्पर्धेचे आयोजन राहुरी कृषी विद्यापीठाच्या महिला जिमखाना हॉलमध्ये केले होते. या स्पर्धेमध्ये ज्ञानगंगा विद्यानिकेतन मांचीहिल (ता. संगमनेर) शाळेच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले. यामध्ये १७ वर्षे वयोगटामध्ये शाहीद शेख, सिद्धेश दाते, रोहन साबळे यांनी प्रथम क्रमांक मिळवला. तर १९ वर्षे वयोगटामध्ये प्रताप आव्हाड, अपूर्वराज बलमे, विराज चोरमले, सार्थक वाकचौरे, प्रमोद दुसुंगे, निखील जाधव, ऋतीक घुगे, शिवम आघाव, पृथ्वीराज शिंदे, सिद्धार्थ पारे यांनी प्रथम क्रमांक मिळवून घवघवीत यश प्राप्त केले. या विद्यार्थ्यांची पुणे येथे होणाऱ्या स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या स्पर्धेमुळे दहावी व बारावीमध्ये विद्यार्थ्यांना ग्रेस गुण मिळण्यासाठी मदत होणार आहे. या यशाबद्दल प्राचार्य विजय पिसे, संचालिका नीलिमा गुणे यांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना प्रशिक्षक रवींद्र बनगया यांनी मार्गदर्शन केले.

सोनई-गणेशवाडी रस्त्यावरील वस्तीवरून तीन शेळ्यांची चोरी

गणेशवाडी (वार्ताहर)– नेवासा तालुक्यातील सोनई-गणेशवाडी रोडवरील शेटे वस्ती येथे तीन शेळ्यांची चोरी झाल्याची घटना घडली आहे. पोलीस सुत्रांकडून समजलेल्या माहितीनुसार एकनाथ रामनाथ शेटे वय- ५५, रा.सोनई गणेशवाडी रोड यांच्या राहत्या घरासमोरून दि. २६ जून रोजी रात्री कुणीतरी अज्ञात चोरट्यांनी तेरा हजार रुपये किंमतीच्या दोन शेळ्या व एक बोकड चोरून नेला असल्याची फिर्याद शेटे यांनी सोनई पोलीस ठाण्यात दिली आहे. दाखल फिर्यादीवरून भारतीय दंड विधान कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास हवालदार बाळासाहेब बाचकर करत आहेत.



श्रीगोंद्याच्या गौणखनिज पथक हल्ल्यातील आरोपींना अटक करा

नेवाशात महसूल कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन

नेवासा (शहर प्रतिनिधी)– श्रीगोंदा तालुक्यातील गौणखनिज पथकावर झालेल्या हल्ल्यातील आरोपींना अटक न करण्यात आल्याच्या निषेधार्थ नेवासा तालुका तलाठी, मंडलाधिकारी, महसूल सहाय्यक, अव्वल कारकून, शिपाई व कोतवाल संघटना यांनी कामबंद आंदोलन करत तहसीलदारांना निवेदन दिले.

गुन्ह्यातील आरोपींना अटक होईपर्यंत सर्व तलाठी व महसूल कर्मचारी संघटना नैसर्गिक आपत्ती कामकाज वगळता सर्व कामकाजावर बहिष्कार टाकून कामबंद आंदोलन करीत आहोत. तसेच तहसील कार्यालय नेवासा येथे धरणे आंदोलन करणार आहोत.

भविष्यात या तालुक्यामध्ये देखिल अवैध गौणखनिजाबाबत कारवाई करताना शस्त्रधारी पोलीस बंदोबस्त, नायब तहसीलदार दर्जाचा अधिकारी तसेच सरकारी वाहन असल्याशिवाय कोणतीही गौणखनिज कारवाई करणे शक्य होणार नाही, असेही निवेदनात म्हटले आहे. निवेदनावर बी. एन. कमानदार, आर. के. साठे, ए. व्ही. गव्हाणे, सोपान गायकवाड, बी. एम. मलदोडे, एस. के. गायकवाड, ए. डी. कोकणे, व्ही. के. जाधव, एस. बी. थोरात, एस. पी. उप्पड, ए. के. गायकवाड, ए. बी. वाघमारे, आर. के. गिते, एस. बी. कदम, एस. ए. भाकड, आर. आर. भुतकर, ए. एन. टिकेकर, श्रीमती बांगर, आर. एस. गाडेकर, ए. बी. दिघे, धिरज साळवे, एफ. बी. सय्यद, ए. पी. भांगे, ए. बी. शिंदे, एस. टी. गव्हाणे, डी. आर. पांढरे, एस. पी. जाधव, एस. व्ही. दातिर, ए. एस. कासार, वाय. के. मिसाळ, टी. आर. साळवे, श्रीमती पुंड, श्रीमती पाटोळे, श्रीमती देठे, पी. जे. कांबळे, बी. एम. कुसमुडे, संजय भालेराव, अशोक वाघमारे, पी. एन. दहिफळे आदींची नावे आहेत.

ब्राम्हणीत जमिनीच्या वादातून वडिलांचा खून

करोना झाल्याचे भासवून खून केल्याचा मुलाचा आरोप; चार जणांवर गुन्हा दाखल

उंबरे (वार्ताहर)– जमीन हडपण्यासाठी कारोना काळात करोनाची लागण झाल्याचे भासवून राहुरी तालुक्यातील ब्राम्हणी येथील एका वृध्द इसमाला लोणी काळभोर टोल नाक्याजवळील एका रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर त्या व्यक्तीचा खून केला, असा आरोप मृत व्यक्तीच्या मुलाने केला आहे. याप्रकरणी मुलाने न्यायालयात दाद मागितली होती. न्यायालयाच्या आदेशावरून हडपसर पोलिसांनी चार जणांवर खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. यामध्ये एका पोलीस कर्मचाऱ्याचा समावेश आहे. हा प्रकार २६ मे २०२१ ते २६ जून या कालावधीत घडला आहे.

राजेंद्र नारायण तेलोरे (वय ४५, रा. खळेवाडी, मु.पो. ब्राह्मणी, ता. राहुरी) यांनी पुण्याच्या प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय क्रमांक सात मध्ये फौजदारी किरकोळ अर्ज दाखल केला होता. फिर्यादी सध्या कामानिमित्त नाशिक येथे राहत असून त्यांचे आई-वडिल मूळ गावी ब्राम्हणी येथे राहत होते. ते दोघेही आजारी असल्याने त्यांची देखभाल करण्यासाठी केअरटेकर म्हणून एका महिलेला कामावर ठेवले होते. गणेश पोटे हा पोलीस कर्मचारी असून फिर्यादी राजेंद्र तेलोरे यांचा भाचा आहे तर विलास तेलोरे हा सख्खा भाऊ आणि आकाश तेलोरे हा पुतण्या आहे. हे सर्व राजेंद्र तेलोरे यांच्या आई-वडिलांना जमिनीसाठी त्रास देत होते. त्यामुळे मयत नारायण यांचे तिघांबरोबर सतत वाद होत होते. १४ मे २०२१ रोजी गणेश पोटे याने केअरटेकरला न सांगता नारायण तेलोरे यांना मांजरी येथे आणले. त्यानंतर २६ मे २०२१ रोजी मध्यरात्री एका हॉस्पिटलमध्ये दाखल केल्याचे राजेंद्र तेलोरे यांना सांगितले. तसेच त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याचे सांगितले. वडिलांच्या मृत्यू बाबत विचारणा केली असता फिर्यादी यांना उडवाउडवीची उत्तरे देऊन घाईघाईने वडिलांवर अंत्यसंस्कार केले.

राजेंद्र तेलोरे यांना वडिलांच्या मृत्यूबाबत संशय आल्याने त्यांनी रुग्णालयातील डॉक्टरांकडे विचारणा केली. मात्र, त्यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली. डॉक्टरने पोटे यांना बोलावून घेतले. पोटे याने फिर्यादी यांना धमकी दिली. तसेच वडिलांच्या मृत्यूबाबत गावात कोठेही बोलू नको, आमच्या नादी लागू नको. नाहीतर तुझ्या बापाच्या किडन्या जशा गायब केल्या, तशा तुझ्यापण गायब करून तुला संपवून टाकेन, अशी धमकी दिली. तसेच काठी, तलवार व गजाने मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे.

याप्रकरणी गणेश विलास पोटे (वय ३७, रा. मांजरी ग्रीन ॲनेक्स, हडपसर), विलास नारायण तेलोरे (वय ५७), आकाश विकास तेलोरे (वय २८, दोघे रा. ब्राह्मणी, ता. राहुरी, अहमदनगर), शिवम हॉस्पिटल अशी चार जणांच्या विरोधात पोलिसांनी फौजदारी संहिता कलम १५६(३) प्रमाणे न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार आयपीसी ३०२, ३४ नुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सहाय्यक निरीक्षक नानासाहेब जाधव करीत आहेत.

गोदाम फोडून तेरा लाखांची मशिनरी लंपास

राहुरी (प्रतिनिधी)– राहुरी येथील टाकळीमिया रस्त्यावरील एका व्यापाऱ्याचे गोदाम फोडून तब्बल १३ लाखांची मशिनरी चोरून नेण्याची घटना घडली असून या घटनेमुळे परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

राहुरी येथील गोकुळ कॉलनी येथे राहणारे व्यापारी अतुल सुभाष नहार यांचे टाकळीमिया रस्त्यावर मका मिलचे गोदाम आहे. अज्ञात चोरट्याने २२ ते २५ जून रोजी सकाळी ९ च्या दरम्यान या मका मिल गोदामाच्या शटरचे कुलूप तोडून त्यातील १३ लाख रुपये किंमतीच्या मशिनरी चोरून नेल्याचे लक्षात आले. याप्रकरणी व्यापारी अतुल नहार यांनी फिर्याद दिली असून राहुरी पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरूद्ध भादंवि कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

राहुरी तालुक्यात गुटखा वितरणाची मोठी साखळी

यंत्रणा झोपेत नसून झोपेचे सोंग घेत असल्याची चर्चा

राहुरी (तालुका प्रतिनिधी)– राहुरी तालुक्यात गुटखा विक्रीबाबत दैनिक सार्वमतने वास्तव मांडताना शासकीय यंत्रणा 'कुंभकर्ण झोपेत' असल्याचे म्हटले. मात्र, याबाबत सर्वसामान्य नागरिकांकडून शासकीय यंत्रणा झोपलेली नसून झोपेचे सोंग घेत असल्याच्या प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. राहुरी तालुक्यात हा गुटखा वितरण करण्यासाठी मोठी यंत्रणा कार्यरत असल्याची माहिती समोर आली आहे.

राहुरी खुर्द येथील एका तालुकास्तरावरील वितरकाला नगरच्या वितराकडून गुटखा पोहच होतो. त्यानंतर सर्व साखळी फिरून हाच गुटखा तालुक्यात सर्व खेडे व शहरात वितरण करण्याची व्यवस्था चालते. यामध्ये जिल्हा वितरकाकडून संबंधित यंत्रणेकडे मोठी रक्कम जमा होते अशी माहिती या धंद्यातील काही टपरीधारक देतात. त्याचबरोबर स्थानिक पोलीस यंत्रणा, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग व इतर शाखांना यासाठी वेगळा निधी द्यावा लागतो. त्याचबरोबर स्थानिक खेड्यात पोहोचविणाऱ्या किरकोळ व्यापाऱ्यांकडून पुन्हा वेगळा हप्ता तर किरकोळ टपरी व किराणा दुकानात गुटखा विकणाऱ्यांकडून वेगळी याप्रमाणे लाखो रुपयाची उलाढाल शासकीय यंत्रणेला होत असल्याची माहिती स्थानिक नागरिक व या धंद्यातील लोकांकडून समजते. जिल्हा वितरकाला त्याचा व्यवसाय जास्त वाढावा म्हणून सर्व तालुका स्तरावरील वितरकांना इतर जिल्ह्यातून माल न आणता कितीही भाव लावला तरी त्याच्याकडूनच माल घेण्याची अघोषित सक्ती संबंधित यंत्रणेकडून भ्रमणध्वरीद्वारे केली जाते. हीच पद्धत तालुकास्तरावरील डीलर बाबतही राबविली जाते. ज्यांनी बाहेरून माल आणला त्यांच्यावर छापे टाकण्यात येईल, असा निरोप संबंधित यंत्रणेकडून विक्रेत्यांना दिला जातो. यातून इतरांपेक्षा प्रत्येक मालाला २०० ते ३०० रुपये जास्त तालुका वितरकाकडून घेतले जात असल्याची तक्रार स्थानिक किरकोळ विक्रेते चर्चेतून करताना दिसून येतात. या गोरख धंद्यातून मोठी माया खालपासून वरपर्यंत

> काही युवक तर दररोज यासाठी शंभर ते पाचशे रुपयांपर्यंत खर्च करत असल्याने अवैध मार्गाने यासाठी पैसा उपलब्ध करण्याचा मार्ग स्वीकारतात. त्यामुळे दोन्ही बाजूने युवा पिढीचे मोठे नुकसान होत असून, शासनाने याकडे गांभीर्याने पाहण्याची अपेक्षा सर्वसामान्य नागरिकांतून व्यक्त होत आहे.

शासकीय यंत्रणेला पोहोच होत असल्याने 'आमचे कोणीच काही करू शकत नाही' अशा थाटात ही मंडळी व्यवसाय करीत आहेत. मात्र यातून शासनाच्या महसुलावर पाणी फिरतानाच अधिकाऱ्यांचा महसूल मात्र, वाढताना दिसत असल्याची माहिती जाणकार नागरिकांकडून समजते. या गोरख धंद्याला पोलीस व अन्न भेसळ प्रशासनाच्या वरिष्ठांनी त्वरित लक्ष देऊन आळा घालावा व धोक्यात येत असलेल्या तरुण पिढीला वाचवावे, अशी मागणी राहुरीकरांतून होत आहे.

नवी आशा नवी दिशा सार्वमत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक राजेंद्र कृष्णराव सोनवणे यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि. यांच्याकरिता प्लॉट क्र. एन.११, एम.आय.डी.सी, अहमदनगर येथे मुद्रित करुन प्लॉट क्र. एन. ११, एम.आय.डी.सी, अहमदनगर ४१४१११ येथे प्रसिध्द केले आहे. • संपादक- * अनंत सा. पाटील : ☎ (०२४२२) २२२४६४,२२२६२९. फॅक्स : २२२७९४. अहमदनगर कार्यालय : ☎ (०२४१) २४३११०३/०४ फॅक्स : (०२४१) २४३११०५. R.N.I Regi. No. 31816/1976. पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. रजि. नं. बी.आय.आय./आर.एन.पी./एस.आर.पी./००३/२०२१-२३ (* पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे)